# संगीत शिक्षण

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - साहित्य सहकार, संपा. ग. त्र्यं. माडखोलकर, साहित्य सहकार संघ लि., महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती-मंडळ, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय प्रकाशन, ऑक्टोबर १९६९)

कलाशिक्षणात ज्या समस्या सर्वसामान्यतः आढळतात त्यापेक्षा काही वेगळ्या समस्या प्रत्येक कलेच्या शिक्षणातही येतात. विविध कलांच्या स्वरूपभेदानुसार या वेगवेगळ्या असतात. संगीतशिक्षणाच्या म्हणून काही खास समस्या विचारात घ्याव्या लागतात ते याच कारणाने होय!

परंतु संगीतातही परंपरा असतात. देश-संस्कृती यानुसार संगीताचे स्वरूपही बदलते. तेव्हा विशिष्ट संगीत परंपरेच्या शिक्षणातही काही खास शिक्षण समस्या उद्भवणे शक्य आहे. उदाहरणार्थ, पाश्चात्त्य संगीताचे शिक्षण ज्या पद्धतीने देता येईल ती पद्धत जशीच्या तशी भारतीय संगीताच्या शिक्षणात वापरता यावयाची नाही. याला कारण अर्थात या दोन्ही संगीत परंपरांच्या स्वरूपात असलेले भेद हेच होय. पाश्चात्त्य संगीत परंपरेत संघगायनाचा प्रकार खूप विकसित झालेला असल्याने गायन शिक्षणाच्या पद्धतीही त्याला अनुसरून ठरल्या. (पाश्चात्त्यांकडे दृढमूल झालेल्या "म्युझिकल ॲप्टिट्यूड" पारखण्याच्या ज्या कसोट्या आहेत त्या कसोट्याही मुख्यतः समूहाला लागू होणाऱ्या आहेत हे लक्षणीयच म्हणावयास हवे.) आता या पद्धती भारतीय संगीतपरंपरेत आयात करावयाच्या म्हटल्यास एक वेगळीच अडचण उत्पन्न होण्याची शक्यता आहे. कारण संघगायनाचा भारतीय संगीतात प्रचार जवळजवळ नाहीच म्हटले तरी चालेल. मुद्दा असा की संगीतशिक्षणाच्या समस्या कलाशिक्षणातील समस्यांपेक्षा काहीशा निराळ्या असतील; एवढेच नव्हे तर एकंदर संगीतकलेच्या शिक्षणात उद्भवणाऱ्या समस्यांखेरीज वेगवेगळ्या संगीतपरंपरांनुसार संपूर्णतः निराळ्या अशाही काही अडचणी उद्भवणे शक्य आहे.

हाच विचार पुढे चालविल्यास असे म्हणता येईल की संगीतपरंपरांच्या स्वरूपानुसार ज्याप्रमाणे संगीतशिक्षणातील प्रश्न बदलतील त्याचप्रमाणे एकाच संगीतपरंपरेतील वेगवेगळ्या संगीतप्रकारांच्या शिक्षणाबाबतही निरनिराळ्या समस्या उभ्या राहतील. प्रत्येक समस्येचे स्वरूप हे संबंधित संगीतस्वरूपावर अवलंबून असल्याने संगीतप्रकार बदलला की त्याच्या शिक्षणातली समस्याही बदलणे तर्कशुद्ध होय. निराळ्या शब्दांत असे म्हणता येईल की कला, संगीत, विविध संगीत परंपरा आणि परंपरांतर्गत संगीतप्रकार या सर्वांच्या शिक्षणात निरनिराळ्या समस्या उद्भवू शकतील. या सर्व पातळ्यांवर उत्पन्न होणाऱ्या शैक्षणिक अडचणी, त्यांच्या परिहारासाठी शक्य असणारे उपाय आणि त्यांची अंमलबजावणी इ. चा तपशीलवार व स्वतंत्र विचार करता येईल.

परंतु मला वाटते, इथे पद्धती आणि तंत्र यात थोडा भेद करून घ्यायला हवा. संगीतशिक्षणविषयक अडचणी या पद्धतीच्या संदर्भात लक्षात घ्यावयाच्या असतात. संगीत या कलेचे विशिष्ट स्वरूप पाहून, त्यात उपयोगात येणाऱ्या शारीर-मानसिक शक्तीच्या विविध भूमिकांचे आकलन करून, विश्वाच्या एका विशिष्ट व्यापारास (उदा. ध्वनिविषयक) रूप देणे हे संगीतकाराचे ध्येय असते. यासाठी आवश्यक ती जाणीव संक्रांत करण्यास संगीतशिक्षण बद्धपरिकर असते. मुद्दा असा की एक मूलभूत मनोभूमिका (जी इतर व्यवहारापेक्षा संगीतव्यवहारास अधिक आवश्यक असते.) निर्माण करणे हा संगीतशिक्षणाचा हेतू आहे. ही मनोभूमिका सिद्ध झाली की कोणतेही संगीत वा संगीतप्रकार यांचा अभ्यास व शिक्षण नीटपणे शक्य होते. ही विशिष्ट मनोभूमिका सिद्ध करण्याचे जे

©DR ASHOK DA RANADE MEMORIAL TRUST

सर्वसामान्य मार्ग असतील त्यांचा साकल्याने, सहेतुक उपयोग करणारी ती पद्धत. उलटपक्षी वेगवेगळ्या संगीतपरंपरा वा प्रकार यांचे शिक्षण देत असता (वर उल्लेखलेली सर्वसामान्य मनोभूमिका तयार झाल्यानंतर) विशिष्ट कौशल्य, विशिष्ट तंत्रे यांचे कॉम्युनिकेशन होत असते. या तंत्राविषयीसुद्धा विचार करता येईलही. पण संगीतशिक्षणाच्या विचारापेक्षा संगीतपरंपरा आणि संगीतप्रकार यांच्या शिक्षणाबाबतच्या समस्या याकामी सर्वसामान्य असतात. व तुलनेने कमी मूलभूतही असतात. हे लक्षात घेऊन हा विचार झाला, म्हणजे त्याला अग्रक्रम द्यावयाची चूक व्हावयाची नाही. इतर कलांच्या शिक्षणापेक्षा संगीत शिक्षणाच्या समस्यांचे स्वरूप काय ,याचा मूलभूत विचार प्रथमतः होणे जरूर आहे. या व्यापक विचाराच्या पायावर भारतीय संगीत कसे शिकवावे किंवा ख्याल, ठुमऱ्या कशा शिकवाव्या; या संबंधीचा विचार उभा राहू शकतो. अन्यथा मूलग्राही तात्त्विक विचार बाजूला ठेवून तर्कत: नंतरच होऊ शकणाऱ्या तपशीलविषयक, तंत्रविषयक विचारात गुरफटण्याचा प्रमाद घडेल. हा असा प्रमाद घडतो हीच संगीतशिक्षणातील पहिली समस्या आहे.

याचा अर्थ असा की संगीतशिक्षणात एक विशिष्ट ग्रहणक्षम मनोभूमिका तयार करून घेणे ही गोष्ट प्रथम व्हायला पाहिजे. विद्यार्थ्यात (म्हणजे संगीतशिक्षण घेऊ पहाणाऱ्यात) अशी मनोभूमिका तयार होण्याची शक्यता आहे की नाही याची कसोटी घेतली जाऊन नंतर त्याला काय व कसे शिकवावे, याची निश्चिती व्हावी. सर्वांना सारखे शिक्षण देण्याच्या प्रकारात शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या मानसिक शक्तीचा प्रचंड व्यय होतो. महिन्याला खर्च किती पडतो याचा हिशेब करता येतो पण सरसकट संगीतशिक्षणात मानसिक शक्तीची अपरिहार्यपणे होणारी अनाठायी उधळपट्टी आपल्या (तितक्या सहजपणे) लक्षात येत नाही. पण म्हणूनच याचा अर्थ असा की आपण या प्रकाराचा अधिक कसोशीने छडा लावला पाहिजे. मानसिक शक्तीच्या अपव्ययाने निर्माण होणारे ताण हे समग्र व्यक्तिमत्त्वास उणेपणा आणतात, हे ध्यानात घेणे अत्यंत आवश्यक आहे.

शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या मानसिक शक्तीचा अनाठायी व्यय टाळणारी संगीत-शिक्षणपद्धती अस्तित्वात येणे आवश्यक आहे. इतकेच नव्हे तर या मनःशक्तीचे अधिक उपकारक उपयोजन करणारीही संगीत-शिक्षणपद्धती अस्तित्वात आली पाहिजे. यासाठी अर्थात वेगवेगळे अभ्यासक्रम आखले गेले पाहिजेत. ज्याला कलावंत व्हायचे असेल त्यापेक्षा ज्याला केवळ संगीताचा आनंद घ्यावयाचा असेल अशाचे शिक्षण वेगळे हवे. किंबहुना एखाद्यास कलावंत होणे शक्य आहे का, याची कसोटी घेऊन मगच त्याला विशिष्ट शिक्षण देता यावे, हे शक्य झाले पाहिजे. विनाकारण नंतर येणारी निराशा व वैफल्य टाळण्यास हाच एक उपाय आहे. ज्याला कलावंत व्हायची मनीषा असेल पण ज्याच्याजवळ त्यासाठी आवश्यक त्या शक्तीचा निश्चितपणे अभाव दिसतो अशांसाठी निरनिराळे शिक्षणक्रम असावेत. चांगले गाऊ-वाजवू न शकणाराही उत्तम संगीतदिग्दर्शक, रचनाकारही होऊ शकतो.

संगीतशिक्षणात विविध अभ्यासक्रम हवेत. त्याचप्रमाणे संगीतशिक्षणातला अनुकरणावरचा भरही गेला पाहिजे. "मी गातो तसे गा" हा प्रकार बंद झाला पाहिजे. "असे हवे म्हणून असे गा' अशी कार्यकारणपरंपरा समजून देण्याचा प्रयत्न अधिक झाला पाहिजे. विद्यार्थी विशिष्ट अवस्थेत जाईपर्यंत त्याला काही गोष्टी समजू शकतच नाहीत, तोपर्यंत अनुकरण कर असे सांगणे भाग पडते असा युक्तिवाद केला जातो. पण हा काहीसा ढोबळ युक्तिवाद आहे. अनुकरणाला हरकत आहे ती अशासाठी, खऱ्या अर्थाने संगीतात अनुकरण होत नाही. ज्या प्रकारे एखादा चित्रकलाशिक्षक वा नृत्यकलाशिक्षक आपल्या विद्यार्थ्याचा हात हव्या त्या ठिकाणी नेऊन ठेऊ शकतो त्या तऱ्हेने गायन-वादन शिक्षक करू शकतो की नाही याविषयी शंका आहे. नेमके अनुकरण शक्य नसले की अंतिम परिणाम या ना त्या प्रकारे तसाच कसा साधता येईल इकडे लक्ष जाते.

अनुकरणाऐवजी पुनरावृत्ती आणि जिवंत संस्कारग्रहण व आविष्कार याऐवजी अनुमानधक्क्याने केलेली यांत्रिक प्रतिक्रिया असा प्रकार होतो. निष्कर्ष असा की समज येईपर्यंत अनुकरण हे तर अधिकच घातक आहे. समज आल्यावर अनुकरण

चालेलही पण तोपर्यंत सर्व प्रयत्न समज आणण्याच्या दिशेनेच होणे आवश्यक आहे. अनुकरण हीसुद्धा एक मानसिक साद (Response) आहे. शारीर घटकांचा विशिष्ट उपयोग करून साधलेले विशिष्ट मूर्त परिणाम; असे अनुकरणाचे स्वरूप नाही. ही अनुकरणाची विकृती होय. सारख्या आंतरिक व्यापारातून स्वरूपगत अपरिहार्यतेमुळे सिद्ध आणि आविष्कृत होणारी घटना म्हणजे अनुकरण होय. करायचाच असेल तर अनुकरणाचा उपयोग या पार्श्वभूमीवर झाला पाहिजे. अनुकरण म्हणजे पुनर्निर्मिती असते. पुनरावृत्ती नव्हे! हे ध्यानात घेऊन संगीतशिक्षणाचा आणि त्याचा संबंध स्थापित व्हावा.

संगीतशिक्षणात विशिष्ट मूलभूत मनोभूमिका तयार करून घ्यायला हवी, तऱ्हेतऱ्हेचे अभ्यासक्रम हवेत आणि खऱ्या अर्थाने अनुकरणाचा उपयोग व्हावा; यापेक्षा संगीताशी काहीशा अप्रत्यक्षपणे संबंधित असणारा संगीतशिक्षणातला घटक म्हणजे संगीतशिक्षणाची व्यवहाराभिमुखता. याचा अर्थ असा की संगीत शिकणाऱ्यांची जीवनातली एकंदर पात्रता ही भाषा इ. विषय शिकणाऱ्याएवढी व्हावी. यामुळे संगीत शिकणाऱ्याची लायकी फक्त संगीतातच, असा समज न राहता संगीताच्या अभ्यासकास उपलब्ध असणारी "कामधंद्याची शक्यता"ही (जॉब पोटेन्शियल) वाढेल. भाषा-विषय घेणारा आणि संगीत घेऊन पदवी मिळविणारा यात कारकुनी नोकरीसाठीसुध्दा भाषा पदवीधारक अधिक लायक समजला जातो, ही परिस्थिती बदलली पाहिजे. संगीतशिक्षण हे संगीतात प्रावीण्य मिळविणाऱ्यांसाठी (तांत्रिक शिक्षणाप्रमाणे) विशिष्ट कौशल्य संक्रांत करण्यावर भर देणारे असावे. इतरांसाठी संगीत शिक्षणात सर्वसामान्य मानसिक पातळी, पात्रता विशिष्ट पातळीची करता येईल. इतके ते व्यवहाराभिमुख असावे. संगीत आणि व्यवहार वा सांगीतिक पात्रता आणि जीवनातील स्थान, यांच्यात काही परस्परानुकुल संबंध प्रस्थापित व्हावयाचे असतील तर संगीत शिक्षण म्हणजे केवळ तंत्रशिक्षण ही परिस्थिती बदलली पाहिजे. इंग्रजी, गणित इ. विषय शालेय शिक्षणात जमत नाहीत म्हणून महाविद्यालयीन जीवनात संगीत शिकणाऱ्यांची संख्या मग निश्चितपणे कमी होईल!

या सर्व शिफारशींनाही मूलभूत ठरणारी अशी गोष्ट कोणती असा प्रश्न विचारल्यास असे म्हणता येईल की संगीत शिक्षणातला गूढवाद नष्ट झाला पाहिजे. मूलभूत असतानाही याचा उल्लेख शेवटी करण्याचे कारण हे की संगीतशिक्षणापासून संगीतास्वादापर्यंत सर्व संगीतव्यवहारात हा गूढवाद ठाण मांडून बसवलेला आहे. "आले तर सर्व येते नाहीतर काहीच हाती लागत नाही" इ. संगीताविषयी केली जाणारी विधाने सर्व कलांच्या बाबतीत करता येतात. "सर्वांसाठी संगीत नसते, संगीतासाठी काही खास आत्म्यांचा जन्म असतो" इ. विधानांचीही तीच कथा आहे. कोणत्याही क्षेत्रांतले उच्चतम पद वा त्या दिशेने केलेला प्रयत्न यांनाही वर उल्लेखलेली वा तत्सम सूत्रे लागू पडतात. तेव्हा संगीतशिक्षण, संगीताभ्यास यांचा जमिनीवर पाय ठेवून विचार करण्यास हरकत नसावी. हेतू, पद्धती आणि फलित यांचा विचार कुठल्याही विषयाच्या शिक्षणासंबंधी करावा लागतो. संगीताचा त्यास अपवाद नाही. असा विचार केल्यावर संगीताविषयीचे सर्व काही प्रत्यक्ष हाती लागण्याएवढे मूर्त होईल असा दावा नाही. पण निश्चित पद्धतीच्या उपयोजनाने शक्य होणारी निश्चितार्थ, मूर्त अवस्था आणि आलेख काढता न येणारी अमूर्त अवस्था यातला भेद स्पष्ट होईल. अमूर्त गोष्टींविषयीचा विचार मूर्त असू शकतो. विशिष्ट मर्यादेपलीकडे विशिष्ट गोष्ट स्पष्ट करता येत नाही, शब्दगत होत नाही हे सुद्धा स्पष्टपणे व शब्दात सांगता येते. इतकी बुद्धिगम्यता संगीतातही असू शकते. संगीतशिक्षण व त्यासंबंधीचा विचार यातही त्याचा आढळ व्हावा.

---